JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# “निवडक पुरुष आत्मकथनांची मौलिकता”

संशोधक :-.
श्री प्रकाश गंगाराम बावणे
मो.नं.9689300611
ई-मेल bawane.prakash11@gmail.com

मार्गदर्शक :-
प्रा.डॉ. शिवाजी नीळकंठ नागरे
विभाग प्रमुख,मराठी विभाग
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला.

आधुनिक मानवी समाज हा अधिक गुंतागुंतीचा बनत आहे. त्यात वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. समाजाच्या विविध घटकांमध्ये संघर्षाचे व विविध सामाजिक समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. समाजातील विविध प्रश्न व समस्यांचा विघातक परिणाम समाजावर होत आहे. समाजाची परिवर्तनीय सामाजिक परिस्थिती, प्रश्न, समस्या त्यांचे सामाजिक, आर्थिक परिणाम इत्यादी संबंधी सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन केले जात आहे. सामाजिक जीवनात घडणाऱ्या घटना अतिशय जटील व गुंतागुंतीच्या असल्या तरी संशोधकांनी मानवी वर्तन व सामाजिक संस्थांची वस्तुस्थिती मांडली आहे. त्यामुळे बदलत्या सामाजिक परिस्थितीचा, व्यक्तीच्या वर्तनावर, मनोवृत्तीवर, कौशल्यावर व एकूणच सामाजिक परिस्थितीवर निश्चित परिणाम होतो. हेच नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पद्धतशीर प्रयत्नांनी संशोधन केले जात असते.

या पार्श्वभूमीवर निवडक पुरुष आत्मकथनांची मौलिकता महत्त्वपूर्ण ठरते. त्यासाठी “मौलिकता”[१] ही संकल्पना समजून घेणे क्रमप्राप्त आहे. मौलिकता या शब्दाला इंग्रजी भाषेतील शब्द Originality असा आहे. तो Orignal या शब्दापासून बनला आहे. त्याचा मराठी भाषेत मूळचा, नवनिर्मित, अभिनव असा अर्थ होतो. त्यावरून ‘Originality’ म्हणजे ‘Quality of being original’ अर्थात नवनिर्मिती क्षमता, अभिनव क्षमता, अस्सलपणा होय.

निवडक पुरुष आत्मकथन व आत्मचरित्र यामधून जे समाज जीवन आत्मकथनकारांनी मांडले ते मराठी साहित्यातून प्रथमच मांडले गेले. मराठी सारस्वताला अस्पर्शित अशा जाती-जमातींचे ‘जगणे’ लेखकांनी शब्दांकित केले आहे. त्यामुळे निवडक पुरुष आत्मकथनांची मौलिकता सिद्ध होते. त्याची, सांगोपांग चर्चा काही निवडक पुरुष आत्मकथनांच्या मांडणीतून पुढीलप्रमाणे उलगडून दाखवता येईल.

“कोल्हाट्याचं पोरं” हे मराठीतील एक सुप्रसिद्ध आत्मकथन आहे. या आत्मकथनाचे लेखक डॉ. किशोर शांताबाई काळे त्यांच्या पुस्तक लेखनामागील त्यांची प्रेरणा स्पष्ट करतांना म्हणतात, “पुस्तक लिहिण्याचा माझा हेतू हाच आहे की, आमच्या समाजाला जाग यावी.”[२] यावरून लेखकांच्या कोल्हाटी जमातीची स्थिती-गती स्पष्ट होते. महाराष्ट्रात ज्या काही अठरापगड जाती-जमाती वास्तव्यास आहेत त्यापैकीच एक जमात म्हणजे ‘कोल्हाटी’ जमात होय. कोल्हाटी पुरुष ढोल वाजवतो व कोल्हाटी स्त्री किंवा मुलगी कोलांटउड्या मारून लोकांचे मनोरंजन करते. लोकांनी दिलेल्या पैशातून आपला उदरनिर्वाह चालवतात.कोल्हाटी लोक आपल्या कुरूप मुलींची लग्न लावून देतात. सुंदर मुलींना नाचगाणे शिकवून तमाशाच्या फडातं नाचगाणी करायला पाठवतात. “चिरा” नावाच्या अमानुष प्रथेच्या नावाखाली आपल्या मुलीच्या गोऱ्या शरीराचा सौदा करतात. कृष्णा कोल्हाट्यानं जिजीचं शरीर माधवराव पाटलाला विकलं.कोंडीबाने शांता, बेबी, रंभा,सुशीला या पोटच्या मुलींची शरीरे विकली. अशा गैर मार्गाने पैसा, संपत्ती, जमीन-जुमला मिळवला. मिळालेल्या पैशावर कोल्हाटी पुरुष मौजमजा करतात. कडक इस्त्रीचे कपडे घालतात. दारू पिणे, पान, विडी, सिगारेट असे शौक करतात, मटण खातात, सोयऱ्यांना उधार पैसे देतात. पुरुषांनी कष्ट करून, घाम गाळून पोट भरणे म्हणजे “पाप करणे” आहे, अशी कोल्हाटी समाजात समजूत आहे.

रंगेल, धनदांडग्या “चिरा” उतरवणाऱ्या मालकांपासून कोल्हाटी स्त्रीच्या पोटी जन्म घेणाऱ्या दुर्दैवी अनौरस मुलांना वडिलांचे नाव मिळत नाही. लेखक म्हणतात, “मी, माझी आई माझा भाऊ रक्ताने एक आहोत परंतु कागदोपत्री आम्हाला वेगळं केलं गेलं.”[३] आईचे प्रेम मिळत नाही. मुलं असलेल्या नाचणारणीला कमी लेखले जाते. म्हणून नाचणारणी आपलं पितं बाळ आई-वडिलांजवळ सोडून गावोगाव नाचत फिरते. चांगले संस्कार न झाल्यामुळे हीच मुलं आपल्या बहिणींना नाचायला लावतात. नाचणारणी जर ऐन तारुण्यात मेली तर तिची मुलं कुत्र्याच्या पिलांसारखी सैरा-वैरा फिरतात. त्यांच्यातूनच समाजात गुन्हेगार जन्माला येण्याची दाट शक्यता असते. बालपणी लेखक बब्या बरोबर मुंबईला गेले असते तर डॉक्टर होण्याऐवजी एखाद्या कुंटणखाण्यात भडवेगिरी करत असते.

कोल्हाटी स्त्रियांच्या सतत बदलणाऱ्या उपेक्षित, स्थिती-गती बद्दल बोलतांना लेखक म्हणतात, “साळी, जिजी कोल्हाटीण झाली.कोल्हाट्याची जिजी नंतर पाटलीण झाली. पाटलाची बुरख्यातली जिजी आता जलसा पार्टीत देखील पोरं सांभाळण्यासाठी जाऊ लागली.”[४] वृद्ध कोल्हाटी नाचणारणीच्या वाट्याला उपेक्षित दुर्दैवी जीवन येतं याकडे लेखक वाचकांचे लक्ष वेधून घेतात.

अशाप्रकारे “कोल्हाट्याचं पोरं” या आत्मकथनातून निष्पाप कोल्हाटी मुलांच्या समोरील जगण्यातील समस्या उभ्या केल्या आहेत. त्याचसोबत वृद्ध कोल्हाटी स्त्रियांचे उपेक्षित जगणेही समोर येते.

आपल्या भारत देशामध्ये जात, धर्म या बाबी गंभीर समस्या आहेत. जातीमुळे लोकांमध्ये भेदाभेद निर्माण झालेले आहेत. धर्म, जात हे मानवतावादाच्या नेहमी आड येतात. त्यामुळे माणसाची प्रगती खुंटली आहे. असा आशय व्यक्त करणारे डॉ.शरणकुमार लिंबाळे रचित “पुन्हा अक्करमाशी” हे आत्मकथन आहे.“अक्करमाशी” या आत्मकथनाचा पुनर्विचार करून झालेली नवनिर्मिती म्हणजे “पुन्हा अक्करमाशी” हे आत्मकथन आहे. अक्करमाशी म्हणजे कमअस्सल अनौरस.या आत्मकथनातून लेखकाच्या कौटुंबिक व सामाजिक संबंधाचा आलेख प्रमाण मराठी भाषेतून शब्दांकित झालेला आहे. या आत्मकथनाला गावकुसा बाहेरील जातीयतेचा संदर्भ आहे.दलितांच्या हातची दारू चालते पण पाणी चालत नाही.दलितांची बाई भोगासाठी चालते पण भाकर चालत नाही. अशा विसंगत मनोवृत्तीच्या समाज व्यवस्थेतील अनैतिक विवाहबाह्य संबंधामुळे निर्माण झालेले कौटुंबिक व सामाजिक प्रश्न समाजासमोर उभे केले आहेत. लेखक म्हणतात,“अनेकजणी रखेली होत्या कैकजण रखेलींची मुलं होती. त्या सर्व रखेलींनी आत्मचरित्र लिहिले नाही, किंवा त्यांच्या मुलांनीही नाही.[5]

बदनाम समाज व्यवस्थेचा पंचनामा करून त्यांच्यासारखे दुःख भोग असलेल्यांच्या व्यथा समाजासमोर लेखकाने प्रथमच आणल्या आहेत. लेखक म्हणतात “माझी आई महार, आईची आई संतामाय महार म्हणून मी महार का ? माझे वडील लिंगायत".[६] आई मसाई महार व वडील हनुमंत निंबाळे लिंगायत त्यामुळे लेखकांना अक्करमाशी म्हणून शाळेत हिणवत, कारण लेखकांचा जन्म हा अनैतिक विवाहबाह्य शरीर संबंधातून झालेला होता. लेखक म्हणतात, “माझ्या शरीरातील घाणेरडं रक्त उपसून टाकता येईल का?[७]बालपणी लेखकांना आई-वडील या नात्यांविषयी घृणा वाटायची.

लेखकांच्या जन्मामुळे हनुमंत निंबाळे यांनी लेखकांच्या आईशी संबंध तोडले.पातिव्रत्य गेले, चरित्र नष्ट झालेल्या मसाईने तिच्या गोऱ्या देहाला कोणाचा तरी आधार हवा म्हणून आयुष्याचा सारीपाट पुन्हा गावातील यशवंत पाटलांबरोबर मांडला होता. यशवंत पाटलांपासून मसाईच्या कुशीतून नागिन, निर्मला, सुनंदा, वनमाला, इंदिरा या मुली सिद्धांत व श्रीकांत अशी अनौरस मुलं - मुली जन्माला आलीत. लेखकांना वाटायचे की, अशा कौटुंबिक वास्तवतेमुळे त्यांच्या बहिणींना त्यांचा समाज स्वीकारेल की नाही?. त्यांनाही त्यांच्या आईसारखंच कोणाचं तरी रखेली व्हावे लागेल? यामुळे लेखक अस्वस्थ व्हायचे.

लेखक डॉ.शरणकुमार जेव्हा मोठे झालेत. मोठ्या पदांवर कार्य करून लागल्यावर त्यांच्या वैचारिक कक्षा रुंदावल्या होत्या. तेव्हा ते म्हणतात “मी वर्तमानपत्रात वाचतो. अनैतिक संबंधातून होणारे खून. अनौरस मुलांची हत्या. तेव्हा मला माझी दया येते. माझी आई अशी एकटी नाही. अशा कैकजणी आहेत. माझ्या मायनं माझा गळा दाबला नाही. मला जन्म दिला. मला माझी आई कुंतीपेक्षाही थोर वाटते.[८]

अशाप्रकारे आपल्या सभोवतीच्या समाजातील विदारक वास्तव “पुन्हा अक्करमाशी” या आत्मकथनातून वाचकांसमोर येते.

प्रत्येक जीव जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याला एक पृष्ठभूमी मिळत असते. आई-वडील, नातेवाईक, गोत्र, वंश,कुळ, नाव, गावअशी पृष्ठभूमी मिळत असते. हे सर्व संदर्भ जन्माला आलेल्या व्यक्तीची काळजी घेतात. त्याच्या वाढीसाठी आवश्यक ती साधने उपलब्ध करतात. जन्माला आलेली व्यक्ती स्वतःचे कर्तृत्व निर्माण करते ते आपल्या गणगोतामुळेच डॉ.सुनीलकुमार लवटे या लेखकांच्या जीवनाला अशी कोणतीही पृष्ठभूमी मिळाली नव्हती.“खाली जमीन वर आकाश” अशा परिस्थितीत जन्म घेणाऱ्या लेखकांनी त्याच्या दुर्दैवी जीवनाची कर्मकहाणी “खाली जमीन वर आकाश” या आत्मकथनातून मांडली आहे.

डॉ.सुनीलकुमार लवटे हे एका कुमारी मातेनं जन्माला घातलेलं मुलं होते. समाजभयापोटी अनौरस अ -पत्य म्हणून त्याच्या मातेनं जन्मताच त्यांच्या अव्हेर केला होता. निरागस, निष्पाप जीव आपले रुदन व्यक्त करताना म्हणते, “जन्मदाते वडील माझ्या जन्मापूर्वीच विश्वमित्र झाले म्हणून जन्मदातीनं मला जन्म देऊन सदैव कुंती होणं पसंत केलं.[९]

परपुरुषांच्या फसवणुकीमुळे पाय घसरल्यामुळे गरोदर राहिलेल्या कुमारी माता, परितक्त्या स्त्रियांना समाज चांगल्या नजरेने पाहत नाही. अशा परिस्थितीतून जन्माला आलेल्या नवजात अर्भकांना संडासात,नालीत, नदीत, उकिरड्यावर, अनाथ आश्रमाच्या पायरीवर सोडून दिलं जातं.बरेचदा बाळासह त्याच्या जन्मदातीला ही अनाथालयात बेवारस सोडलं जातं. लेखक म्हणतात."पाय घसरल्याचं प्रायश्चित म्हणून (अशा स्त्रियांच्या नशिबी) मिळालेली अघोषित शिक्षा तिच्या लेखी जन्मठेपच होती.[१०] अशा कुमारी मातेच्या मुलाला लोक लाजेमुळे कुटुंबातील सदस्य सांभाळत नाहीत. समाज अशा मुलांना सुखाने जगू देत नाही. बालपण हरवलेली भावविश्व दुभंगलेली ही मुलं अकारण उपेक्षित वंचित जिणं जगतात.

लेखक म्हणतात, "पुरोगामी महाराष्ट्रात कुमारी माता होणं अनौरस मुलं निपजणं, मुलं अनाथ करणं अव्याहत सुरू आहे.[११] अनाथालयातून वाढलेली सर्वच मुलं लेखकांसारखी उच्च पदावर विराजमान होत नाहीत. त्या मुलांपैकी काही घरगडी, शिपाई, मुलं सांभाळणारी, कारखान्यातील मजूर अशीच काम करतात. ही अनाथ मुलं एकमेकांचे भाऊ-बहीण, काका, सासू-सासरे,व्याही बनून एकमेकांचा आधार होतात.

महाराष्ट्रातील विविध रिमांड होम्स, बाल सुधारगृह, अनाथालय यातील बेवारश्याचे जीवन लेखकांनी या आत्मकथनातून मांडले आहे. लेखक अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने युरोप, आशिया खंडातील अनेक देश फिरले. त्या देशांमधील बेवारस मुलांची-स्त्रियांची स्थिती-गती त्यांनी आत्मकथनातून मांडली आहे. त्या विविध देशातील कुमारीमातागृह, निराधार स्त्रिया, बालके त्यांच्या संगोपनाच्या संस्था खाजगी असल्या तरी तेथील शासन अशा संस्थांना उदार हस्ते अनुदान देते. लेखक म्हणतात. "जन्माला येणाऱ्या अर्भकापासून ते स्वावलंबी होऊन समाजात समाविष्ट होणाऱ्या युवकांपर्यंतच्या अवस्थांच्या वेगवेगळ्या समस्यांचे निराकरण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे आढळते.[१२] तेथील नोकरी करणारे लोक आपल्या पगारातील ठराविक रक्कम अनाथ,अंध-अपंग, मतिमंद बालकांच्या संगोपन, शिक्षण, पुनर्वसन, प्रशिक्षण त्यांच्यासाठी दान करतात. या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील शेजारी असलेल्या अशा संस्थांकडे आपले लोक ढुंकूनही पाहत नाहीत. अशी विसंगती पाहून लेखक अस्वस्थ झाले होतात.

अशाप्रकारे निवडक पुरुष आत्मकथने "कोल्हाट्याचं पोरं ", "पुन्हा अक्करमाशी", "खाली जमीन वर आकाश" यांच्या माध्यमातून आत्मकथनकार लेखकांच्या वाट्याला आलेले दुःख भोग, त्यांची फरफट, घालमेल, त्यांचा काही एका दोष नसतांना आलेली आहे. त्यांच्या जन्मामुळे समाजात वेगवेगळे प्रश्न कसे निर्माण झाले याची खात्री पटते. या लेखकांना मार्गदर्शन मिळाल्यामुळे व हुशार असल्यामुळे ते मोठ्या उच्च पदावर पोहोचले पण असे झाले नसते तर कदाचित हे लेखक गुन्हेगार म्हणून देखील समाजात वावरले असते. समाजातील लोकांना व शासनाला त्यांनी त्रस्त केले असते याचा शासनाने व समाजाने डोळसपणे नक्की विचार करणे गरजेचे आहे हे सूचित होते.

निष्कर्ष

- निवडक पुरुष आत्मकथनांच्या अध्ययनातून समाजात दुर्लक्षित राहिलेल्या घटकांकडे वाचकांचे लक्ष वेधता येते.
- निवडक पुरुष आत्मकथने ही मौलिक आहेत.
- पुरुष आत्मकथनातून बदलत्या सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकल्या गेला आहे.
- पुरुष आत्मकथनातून मानवी व्यवहाराचे अध्ययन करणे शक्य होते.
- पुरुष आत्मकथनातून सामाजिक चालीरीतींचे स्वरूप लक्षात येते.
- पुरुष आत्मकथनांच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्यांचे वस्तुनिष्ठ स्वरूप लक्षात येऊन शासनाचे या भिषण वास्तवाकडे लक्ष वेधता येते त्यावर काही उपाययोजना करता येणेही शक्य होते.

संदर्भ ग्रंथसूची


प्रभुदेसाई सुधाकर, "नवनीत ऍडव्हान्स डिक्शनरी, नवनीत पब्लिकेशन इंडिया लि.दंताली,गुजरात.
काळे किशोर शांताबाई, "कोल्हाट्याचं पोर", मनोगत ग्रंथाली प्रकाशन, १९९४.
तत्रैव, मनोगत.
तत्रैव, मनोगत.
लिंबाळे, शरणकुमार, "पुन्हा अक्करमाशी",दिलीपराज प्रकाशन १९९९. पृ . क्र. ५.
तत्रैव, पृ . क्र. १९.
तत्रैव, पृ . क्र. ७४.
तत्रैव, पृ . क्र. ४६.
लवटे सुनीलकुमार, "खाली जमीन वर आकाश", मेहता पब्लिकेशन कं. पुणे,२००६. पृ . क्र. ८
तत्रैव, पृ . क्र. ४.
तत्रैव, पृ . क्र. ८.
तत्रैव, पृ . क्र. १६४.
आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र", विद्या प्रकाशन, नागपूर २०१८.
भांडारकर पु. ल.,"सामाजिक संशोधन पद्धती", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.


सारांश

निवडक पुरुष आत्मकथनांच्या माध्यमातून बदलत्या सामाजिक परिस्थितीचा व्यक्तीच्या मनावर, वर्तनावर, कौशल्यावर व एकूणच सामाजिक परिस्थितीवर कशा प्रकारचा परिणाम होतो याचे ज्ञान आपल्याला होते."कोल्हाट्याचं पोरं" या आत्मकथनातून लेखक डॉ. किशोर काळे यांनी कोल्हाटी लोकांचे प्रश्न आबालावृद्धांच्या समस्या उपस्थित केल्या आहेत. या लेखनामागे कोल्हाटी समाजाला जागृत करण्याचा त्यांचा हेतू आहे.

"पुन्हा अक्करमाशी" या आत्मकथनाच्या माध्यमातून लेखक डॉ.शरणकुमार लिंबाळे यांनी गावकुसा बाहेरील अस्पृश्यांचे दुःख भोग शब्दांकित केले आहेत."जात" मानणाऱ्या दांभिक पांढरपेशा समाजाला जागं करण्याचा प्रयत्न हे आत्मकथन करते."खाली जमीन वर आकाश" या आत्मकथनातून रिमांड होम्स, बालसुधारगृह, अनाथालयातील जीवनदर्शन घडवून अनाथ आबालवृद्धांच्या समस्या वाचकांसमोर उपस्थित करून समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. या सर्व आत्मकथनातून मांडले गेलेले वास्तव हे मराठी साहित्यांमध्ये अभिनव आहे. त्यामुळे या आत्मकथनांची मौलिकता वर्णनातीत आहे.